# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ६१-२२ दिनांक २३/०२/२०२२

## इयत्ता १० वी व १२ वीच्या परिक्षासंबंधाने पोलीस उप आयुक्तांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) प्रमाणे आदेश लागू.

महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) दिनांक ०४/०३/२०२२ ते दिनांक ३०/०३/२०२२ व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) दिनांक १५/०३/२०२२ ते दिनांक ०४/०४/२०२२ या कालावधीत विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेली आहे.

या अगोदर सदर परिक्षांचेवेळी काही ठिकाणी परीक्षा दरम्यान १०० मीटर परिसरात बेकायदेशीर जमाव जमवून गैरप्रकार करुन परिक्षेत व्यत्यय आणणे, परिक्षार्थी नक्कल करण्यास मदत करणे अशा स्वरुपाचे गैरप्रकार करण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यास प्रतिबंध करण्यासाठी व परिक्षा शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी
श्री. विजयकांत सागर, पोलस उप आयुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) प्रमाणे आदेश लागू केलेले असून त्याद्वारे पोलीस विभागातील प्राधिकृत केलेले पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच परिक्षा प्रक्रियेशी संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी, परिक्षेस बसलेले परीक्षार्थी तसेच अंध व अपंग परिक्षार्थी यांचे बरोबर आलेले नातेवाईकांखेरीज परीक्षा केंद्राच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात बेकायदेशीर जमावास मज्जाव करण्यास तसेच झेरॉक्स सेंटर, फॅक्स सेंटर, टेलीफोन बुथ, यांची दुकाने, सेवा बंद ठेवण्याबाबत व मोबाईल फोन व स्मार्ट वॉच वापर करण्यास मनाई आदेश निर्गमित केलेला आहे.

सदरचा आदेश हा दिनांक ०४/०३/२०२२ रोजीचे ००.०० वाजे पासून दिनांक ०४/०४/२०२२ सायं. २०.०० वाजेपर्यंत परीक्षेच्या दिवसापुरता अंमलात राहणार आहे.

---०००---